आर.सी.सी.३३६/२००३
१ शासन वि. बाबुराव
नि.क्र.८०

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.२ ची शपथेवर जबाब
माझे नांव — बबन संग्राम लांमदाडे,
माझे वय – ५९ वर्ष , धंदा : नोकरी
राहणार – शिवनगर, ता. जि. जालना.

**सरतपासणी सहाय्यक सरकारी वकील श्रीमती व्ही. व्ही. नगरकर यांच्यामार्फत सूरू**

०१. सन १९८६ पासुन मी एन.आर.बी कर्मचारी सहकारी पतसंस्था या संस्थेमध्ये कार्यरत आहे. दि.१७.०५.१९९९ रोजी मी संचालक म्हणुन निवडुन आलो. त्यानंतर दि.१७.०६.१९९९ रोजी मी सदर संस्थेचा अध्यक्ष म्हणुन निवडुन आलो. त्यापुर्वी आरोपी संस्थेचे अध्यक्ष होते. दि.२०.०८.१९९९ रोजी आरोपीने मला सर्व अभिलेख दिले. मला सदर अभिलेख व लेखा परिक्षक अहवाल यावरुन अफरातफर झाल्याचे दिसुन आले. सदर अफरातफर आरोपी बाबुराव व ठकाजी तमखाने यांनी केल्याचे दिसुन आले. आरोपी बाबुराव आज रोजी न्यायालयात हजर आहे.
सरतपास पुर्ण.

**उलटतपास आरोपी क्र.१ तर्फे विधिज्ञ श्री. एन. के. कोहिरे यांच्यामार्फत –**

**पुरसीस नि.क्र.७८ अन्वये आरोपी स्वतः साक्षीदाराचा उलटतपास करणार असल्याने साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे स्वतः –**

०२. मी अध्यक्ष झालो त्यावेळी खरात हे सचिव म्हणुन निवडुन आले होते. हे म्हणणे खरे आहे की, पुर्वीच्या सचिवाने मला संपुर्ण अभिलेख दिला होता. माझे असे लक्षात आले की, ₹१,०७,०००/– खर्चाच्या पावत्या नसताना खर्च दाखविला तसेच ₹३,७५,०००/– देणे नसतांना रुबी बँक भरणा दाखविला गेला. सन २००० ते २००१ यावर्षीचा ताळेबंध पत्रक मला दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे नाही की, सदर ताळेबंध पत्रकामध्ये ₹१,०७,०००/– आरोपीला देणे दाखविले आहे. सदर ताळेबंध साक्षीदारास उलटतपासात दाखविल्याने त्यास नि.क्र.८१ देण्यात येते. हे म्हणणे खरे

नाही की, फिर्यादी यांचे सहकारी यांच्याविरुध्द लाचलुचपतची तक्रार केल्याने मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/-

(सि. म. पाडोळीकर)
दि. ०४.०२.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.